# बृहन्मुंबई महानगरपालिका

**तातडीचे कामकाज क्रमांक ३१२.**
महानगरपालिका कार्यालय,
क्रमांक: म.चि./93043/मनपा.,
मुंबई, दिनांक 10 फेब्रुवारी २०२०.

संदर्भ : दि.६.२.२०२० चा ज्ञाप क्र. एमसीटी/९२६६.

महानगरपालिकेच्या दिनांक ४ फेब्रुवारी २०२० रोजी भरलेल्या सभेत पुढील ठराव* मंजूर झाला आहे, असे मी आपणांस कळवित आहे :-

महानगरपालिकेचा दिनांक ४ फेब्रुवारी २०२० चा ठराव क्रमांक १४०९:-

"संदर्भ:-१) आयुक्तांचे दि. १८.१.२०२० चे पत्र क्र. ईओसी/१३३४; आणि २) शिक्षण समितीचा दि. २१.१.२०२० चा ठराव क्र. १२६.

" आयुक्तांच्या उपरोक्त पत्रात नमूद केलेल्या परिस्थितीत, १) 'जी/उत्तर' विभागातील वुलनमिल महानगरपालिका शाळा येथे, शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये, बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे, आय.सी.एस.ई. बोर्डाचे ज्युनिअर केजी, सिनिअर केजी व इयत्ता १ ली ते ६ वी चे वर्ग, त्याच पत्राच्या परिच्छेद ४ मध्ये अनुक्रमांक १) ते ६) येथे नमूद केलेली कार्यपध्दती अनुसरुन, प्रायोगिक तत्त्वावर सुरु करण्यास; २) सदर शाळेत शैक्षणिक वर्ष २०२० - २०२१ नंतर प्रतिवर्षी नैसर्गिक वाढीने अथवा एकाच वेळी, दहावीपर्यंतच्या सर्व इयत्तांचे वर्ग सुरु करण्यास; आणि ३) शिक्षण खात्याच्या आस्थापना अनुसूचीवरील प्रादेशिक भाषांच्या शाळांमधील शिक्षक संवर्गातील ३१५२ रिक्त पदांमधून भरती करुन, सदर पदे आवश्यकतेनुसार इंग्रजी माध्यमाच्या व एम.पी.एस. (मुंबई पब्लिक स्कूल) माध्यमाच्या शिक्षक पदांमध्ये वर्ग करुन आय.सी.एस.ई. बोर्डाच्या शाळांकरिता शिक्षक उपलब्ध करण्यास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी."

10/2/2020

**महानगरपालिका चिटणिसांकरिता.**

प्रशासकीय अधिकारी (समिति),
महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय.

क्र. एमसीटी / e336
शिक्षणाधिकारी दिनांक 12/02/2020

---

*सदर ठराव, महानगरपालिकेने प्रस्तुत सभावृत्तांत कायम करणे ह्यासापेक्ष आहे.

ठरावाची प्रत माहितीसाठी आणि कार्यवाहीसाठी रवाना
11/2/2020
प्रशासकीय अधिकारी (समिती)
आयुक्तांचे कार्यालय

क्र. एमसीटी / e336
दिनांक 11/2/2020

D:\...\MARATHI SECTION 3\Extract 2020\Extract 1 -odt.odt

बृहन्मुंबई महानगरपालिका
शिक्षण अधिकारी यांचे कार्यालय
वेळ : ११. १२. १३. १४.
१५. १६. १७. १८.
13 FEB 2020
क्रमांक EOC 1489
सही

# बृहन्मुंबई महानगरपालिका- शिक्षण विभाग

क्र. इओसी/१४८९ दि.१३/०२/२०२०

उपशिक्षणाधिकारी-शहर

संदर्भ:- १. क्र.ईओसी/१४५५ दि.१४/०२/२०२०
२.क्र.एमसीटी/९३३६ दि.१२/०२/२०२०.

उपरोक्त संदर्भित ठरावाचे Intimation आपल्या कार्यालयात पाठविण्यात आलेले आहे. सदर ठरावाची प्रमाणित प्रत आपल्या माहितीकरिता व पुढील कार्यवाहीकरिता अग्रेषित.

प्रशासकिय अधिकारी(का)-४

बृहन्मुंबई महानगरपालिका
उपशिक्षणाधिकारी (शहर)
यांचे कार्यालय
24 FEB 2020
दिनांक
क्र. 6695
25/02/2020

प्र.अ.(शाळा), जी/उत्तर विभाग.
संदर्भ:- EOC/1489 दि. 13/02/2020
आपल्या माहिती व पुढील कार्यवाहीकरीता कृपया अग्रेषित.

उपशिक्षणाधिकारी (शहर) करीता
बृहन्मुंबई महानगरपालिका-शिक्षण विभाग

बृहन्मुंबई महानगरपालिका
प्रशासकीय अधिकारी (शाळा)
जी/उत्तर
A0
6914

**बृहन्मुंबई महानगरपालिका- शिक्षण विभाग**

क्र. इओसी/१३६१ दि.३०/०१/२०२०

उपशिक्षणाधिकारी –शहर

संदर्भ:- क्र. ओडी/एमसीटी/४७२९ दि.२३/०१/२०२०

--

दि.२१/०१/२०२० च्या शिक्षण समिति सभेमध्ये बाब क्र.७ (जानेवारी, २०२०) मंजूर असा निर्णय झाला आहे.

कृपया आपल्या माहिती करिता व पुढील कार्यवाहीकरिता अग्रेषीत.

30/1/2020

प्रशासकिय अधिकारी (का)-४

बृहन्मुंबई महानगरपालिका
उपशिक्षणाधिकारी (शहर)
यांचे कार्यालय
03 FEB 2020
दिनांक
क्रमांक 6418

05/02/2020

प्र. अ. (शाळा)

जी/उत्तर विभाग

संदर्भ :- क्र ओडी/एमसीटी/४७२९
२३/१/२०२०

आपल्या माहिती व कार्यवाहिस रवाना

बृहन्मुंबई महानगर पालिका
प्रशासकीय अधिकारी (शाळा)
जी/उत्तर
06 F...
11 12 23 14 15 16
6468

उपशिक्षणाधिकारी (शहर)
बृहन्मुंबई महानगरपालिका

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**समिती उपविभाग, आयुक्तांचे कार्यालय**

पूर्व सूचना क्र. ओडी/एससीटी/ ४७२८

दिनांक - २३/०९/२०२०

---

शिक्षण समिती सभा बाब क्र. ७ कार्यक्रमपत्रिका दि.

ता.का.क्र. माहे / जानेवारी 2020

---

विषय - बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत [illegible] आधार [illegible] करणेबाबत.

---

शिक्षणाधिकारी

माहितीसाठी तसेच योग्य त्या कार्यवाहीसाठी

~~शिक्षण समितीने/महानगरपालिकेने~~ दि. २९/९/२० रोजी भरलेल्या त्यांच्या सभेत उपरोक्त विषयांतर्गतचा प्रस्ताव/ ~~निवेदन पत्र/ पत्रव्यवहार/अहवाल/ठरावाची सूचना~~/विचारात घेऊन त्याबाबत खालील क्र. २ प्रमाणे निर्णय घेतला.

1. ~~उपरोक्त प्रस्ताव मागे घेण्यात आला / तहकूब करण्यात आला (पाहणीकरिता / पुढील विचार).~~
2. ~~महानगरपालिकेत / महानगरपालिकेच्या मंजूरी / संमतिसापेक्ष-- मंजूर / संमत / कार्योत्तर मंजूर / उपसूचनेसह~~ मंजूर / ~~नामंजूर / दप्तरी दाखल~~ / करण्याची सदर समितीव्दारा महानगरपालिकेला शिफारस - - तातडीचे कामकाज.
3. ~~संबंधित व्यक्तीस / नगरसेवकांस आयुक्तांच्या अहवालानुसार महानगरपालिका चिटणीस यांनी परस्पर कळवावे.~~
4. ~~सदर समितीच्या / महानगरपालिकेच्या दि. च्या ठराव क्र. अन्वये -~~
   - ~~अ. निवेदन-पत्र-ठरावाची सूचना आयुक्तांच्या अभिप्रायांसाठी पाठवावे.~~
   - ~~ब. या मागील बाजूर उल्लेख केलेल्या मुद्यांनिशी झालेल्या चर्चेअंती सदर प्रस्ताव / अहवाल / पत्रव्यवहार आयुक्तांकडे फेरविचारासाठी परत पाठवावा.~~
   - ~~क. अंतरिम अहवाल दप्तरी दाखल करावा व आयुक्तांच्या पुढील / अंतिम अहवालाची प्रतिक्षा करावी.~~

~~तरी, समितीचा / महानगरपालिकेचा उपरोक्त बाबतचा ठराव निकालात काढण्यासाठी महानगरपालिका चिटणीसांना पाठवावयाच्या आवश्यक त्या पत्राचा मसुदा ताबडतोब शक्यतो ४५ दिवसांत पाठवावा व सदर कालावधीत मसुदापत्र न आल्यास, महानगरपालिका आयुक्तांसमवेत होणा-या बैठकीत संबंधित खाते / विभाग प्रमुख यांना त्याबाबत कार्यपूर्ती अहवाल सादर करावा लागेल.~~

मात्र, ही पूर्वसूचना, उपरोक्त बाब कशाप्रकारे निकालात निघाली याची सर्वसाधारण कल्पना आहे. तरी, त्यासंबंधी संमत झालेला प्रत्यक्षा ठराव हाच अंतिम व प्रमाण असल्यान, त्याची प्रमाणित प्रत या (समिती) उपविभागाव्दारे महानगरपालिका चिटणीसांचे कार्यालयाकडून त्वरित उपलब्ध करुन घेऊन त्यानुसार कार्यवाही करावी.

त्याचप्रमाणे संमत झालेला ठराव हा महानगरपालिका प्रशासनाने त्या संदर्भात घेतलेल्या भूमिकेशी सुसंगत नसेल तर ठरावाची अंमलबजावणी करण्यापूर्वी कागदपत्र टिप्पणीसहीत आयुक्तांना सादर करुन त्यांचे आदेश घ्यावेत.

बृहन्मुंबई महानगरपालिका
शिक्षण अधिकारी यांचे कार्यालय
११. १२. १३. १४.
वेळ : १५. १६. १७. १८.
२४ ... २०२०
क्रमांक EOC / 1361
सही

शिरवळकर
२३/०९/२०२०

**प्रशासकीय अधिकारी (समिती)**
**आयुक्तांचे कार्यालय.**

सि/र/आ
२३/९/२०

NSCIR64-BMPP-26445-2016-17-5,000 Copy

## शिक्षण समिति

**विषय क्रमांक ७ (जानेवारी २०२०).**

आयुक्तांचे दि. १८ जानेवारी २०२० चे पत्र क्र. इओसी/१३३४:-

विषय:- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत आयसीएसई बोर्डाची शाळा सुरु करण्याबाबत.

--

"बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८च्या कलम ६१ (क्यू) अंतर्गत प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी ही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाची असल्याकारणाने इ. १ ली ते ७ वी पर्यंत विनामूल्य शिक्षण विद्यार्थ्यांना दिले जात होते. तद्‌नंतर शासन निर्णय क्र.एसएसएन-२०१५/प्र.क्र.१६/१५/टीएनटी-२ दि.२८/८/२०१५ अन्वये इ.१ ली ते इ. ८ वी पर्यंतचे शिक्षण हे प्राथमिक शिक्षणांतर्गत विचारात घेतल्याने शिक्षण विभागाव्दारे इ. १ ली ते इ. ८ वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण विनामूल्य देण्यात येऊ लागले. त्याचप्रमाणे मनपा शिक्षण विभागाकडून इ. १० पर्यंतच्या माध्यमिक शाळा चालविल्या जातात.

२. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाकरिता आंतरराष्ट्रीय योग दिवस, कुस्ती स्पर्धा, बॉक्सिंग स्पर्धा, ज्युडो स्पर्धा, सांघिक क्रिडा स्पर्धा, शासकीय क्रिडा स्पर्धा इत्यादी स्पर्धांचे आयोजन, २५ माध्यमिक शाळांमध्ये ई-वाचनालय सुविधा उपलब्ध, माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांची योग्यता चाचणी (Aptitude Test) व व्यवसाय मार्गदर्शन शिबीरे, दरवर्षी बालकोत्सव, पथनाट्य, सहल, शिक्षणोत्सव, मनाचे श्लोक स्पर्धा, संगीत स्पर्धा, बालकमेळावा, इ. उपक्रमाचे आयोजन, पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा यासाठी विद्यार्थ्यांच्या सराव परीक्षांचे आयोजन, दरवर्षी विद्यार्थ्यांना २७ शालेय वस्तूंचे मोफत वाटप, १२१४ डिजीटल वर्गखोल्या सुरू करणे इ. उपक्रमांचे आयोजन केले जाते

३. या आणि अशा विविध उपक्रमांमुळे मनपा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत दर्जात्मक वाढ झालेली आढळून येते. परंतु, सद्यस्थितीत पालकांचा इंग्रजी माध्यमाकडे असलेला कल पाहता मनपा शाळेतील इतर माध्यमाच्या विद्यार्थ्यांच्या संख्येत घट होत आहे. आपला पाल्य जागतिकीकरणात टिकून राहण्याकरिता व उज्वल भवितव्यासाठी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पालक इंग्रजी माध्यमाच्या नव्हे तर परवडत नसताना देखील सीबीएसई,

आयसीएसई बोर्डाच्या शाळेत प्रवेश घेताना दिसत आहेत. यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळांबरोबरच दुर्बल घटकांतील मुलांसाठी आयसीएसई बोर्डाची शाळा सुरु करण्याची नितांत गरज आहे. परंतु सद्यस्थितीत प्रायोगिक तत्वावर जी/उत्तर विभागातील वूलनमिल मनपा शाळा येथे आयसीएसई बोर्डाची शाळा सुरु करणे संयुक्तीक होईल. कारण उपरोक्त सदर शाळा स्थित असलेला परिसर व शाळांमध्ये असलेल्या पायाभूत सुविधा या आयसीएसई बोर्डाची शाळा सुरु करण्यास पोषक आहेत.

४. हयास्तव प्रायोगिक तत्वावर **जी/उत्तर विभागातील वूलनमिल मनपा शाळा** येथे आयसीएसई बोर्डाची ज्युनियर केजी, सिनियर केजी, इ. १ ली ते ६वीचे वर्ग बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये सुरु करण्याचे खालीलप्रमाणे प्रस्ताविण्यात येत आहेत:-

१) **शाळा प्रवेश:-** या शाळांमध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश लॉटरी पध्दतीने दिले जातील.

२) **शालेय सुविधा:**-मनपा शाळेच्या मराठी, हिंदी, गुजराती, तामिळ, तेलगू, कन्नड तसेच एमपीएस शाळांना व विद्यार्थ्यांना ज्या सुविधा दिल्या जातात त्या सर्व सुविधा सदर बोर्डाच्या शाळांना व विद्यार्थ्यांना दिल्या जातील.

३) **जाहिरात देणे:-** सदरहू प्रवेश प्रक्रिया यशस्वीपणे राबविण्यासाठी वर्तमान पत्रातून जाहिरात दिल्या जातील. तसेच शाळेसमोर व वस्त्यांमध्ये बॅनर लावले जातील.

४) **कर्मचारी नियुक्ती:-** शिक्षण खात्याच्या आस्थापना अनुसूचीवर सद्यस्थितीत शिक्षक संवर्गातील एकूण १२१८३ पदांपैकी ४०१७ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांपैकी प्रादेशिक भाषेतील शाळांची ३१५२ पदे रिक्त आहेत. सदरहू रिक्त पदांची भरती महानगरपालिकेच्या इंग्रजी भाषा व एमपीएस माध्यमाच्या (मुंबई पब्लिक स्कूल) पदांमध्ये वर्ग करुन करण्यात येईल. उपरोक्त भरतीतून आईसीएसई बोर्डाच्या शाळेसाठी शिक्षक उपलब्ध करुन घेण्यात येतील. त्या सदरहू कर्मचा-यांचे वेतन हे सद्यस्थितीत जे लागू आहे त्याच प्रमाणे राहिल व खर्चाची तरतूद देखिल सद्यस्थितीतील लागू असलेल्या विभागीय आस्थापनीय महसुल निधीतून करण्यात येईल. तसेच शिक्षकेतर कर्मचारीवृंदांचे अनुदानित शाळांतील अतिरिक्त झालेल्या कर्मचा-यातून सामायोजन केले जाईल. सदरहू कर्मचा-यांचे वेतन हे सद्यस्थितीत जे लागू आहे त्याच प्रमाणे राहिल व खर्चाची तरतूद देखिल सद्यस्थितीतील लागू असलेल्या विभागीय आस्थापनीय महसुल निधीतून करण्यात येईल.

५) **<u>अभ्यासक्रम:-</u>** आयसीएसई बोर्डाच्या निकषानुसार सदर शाळांमध्ये अभ्यासक्रम/शालेय-सह शालेय उपक्रम/मार्गदर्शकतत्वे/मूल्यमापन पध्दत राबविणे बंधनकारक असेल.

६) प्रशिक्षण:- सदरहू योजना सुरु करण्यापूर्वी शिक्षकांना संबंधित मंडळाकडून प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

५. सदरहू उपक्रम कार्यान्वित करण्यासाठी आयसीएसई बोर्डाची मान्यता घेणे आवश्यक असल्याने सदरहू मान्यतेसाठी व आयसीएसई बोर्डाकडून आकारल्या जाणा-या शुल्काची तरतूद शिक्षण विभागाच्या अर्थसंकल्पीय वर्ष २०२०-२१ GL Code-250203000 "शिक्षण विषयक उपक्रम" या लेखाशीर्षातील उपलब्ध निधीतून केली जाईल.

६. यास्तव खालील बाबींकरिता शिक्षण समिती/ महानगरपालिकेची मंजुरी मिळावी ही विनंती.

१) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रायोगिक तत्वावर "जी/उत्तर" विभागातील वूलनमिल मनपा शाळा येथे आयसीएसई बोर्डाची ज्युनियर केजी, सिनियर केजी, इ. १ ली ते ६वीचे वर्ग बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे परिच्छेद ४ मध्ये प्रस्ताविल्याप्रमाणे सुरु करणेस.

२) त्याचप्रमाणे सदर शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ नंतर प्रतिवर्षी नैसर्गिक वाढीने अथवा एकाच वेळी सर्व इयत्ता १० पर्यंतचे वर्ग सुरु करणेस.

३) शिक्षण खात्याच्या आस्थापना अनुसूचीवरील प्रादेशिक भाषांच्या शाळांमधील शिक्षक संवर्गातील ३१५२ रिक्त पदांमधून भरती करुन आवश्यकतेनुसार इंग्रजी माध्यमाच्या व एमपीएस (मुंबई पब्लिक स्कूल) ~~माध्यम~~ माध्यमाच्या शिक्षक पदांमध्ये वर्ग करुन आयसीएसई बोर्डाकरिता शिक्षक उपलब्ध करणेबाबत.

७. कृपया हे कामकाज तातडीचे समजण्यात यावे."